श्री.एस.जे.कोरबु, उद्योग सहसंचालक (गट-अ) यांची तांत्रिक सल्लागार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ या रिक्त पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन आदेश क्र. इएसटी-३४१८/१४२/प्र.क्र.४४/उद्योग-३,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २७ ऑगस्ट, २०१९.

संदर्भ : १. शासन आदेश क्र.बदली-३४१६/प्र.क्र.६०/उद्योग-३, दि.२८.०६.२०१६
२. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे पत्र क्र. मऔविम/साप्रवि/प्रनि/ डी-४०९८४/२०१८, दि.११.१०.२०१८
३.सा.प्र.वि. शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/का.१२, दि.१७.१२.२०१६
४.सा.प्र.वि. शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/का.१२, दि.१६.०२.२०१८

शासन आदेश :-

उद्योग संचालनालयांच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेले श्री.एस.जे.कोरबु, उद्योग सहसंचालक (गट-अ) (वे.श्रे. रु. १५६०० - ३९१०० + ग्रेड पे रु. ७६००) यांच्याकडे संदर्भ क्र.१ च्या आदेशान्वये तांत्रिक सल्लागार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला होता. तथापि, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने त्यांच्या संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये तांत्रिक सल्लागार या प्रतिनियुक्ती पदावर नियमित अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याची विनंती केली आहे.

२. श्री.एस.जे.कोरबु, उद्योग सहसंचालक (गट-अ) यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यास ते सामान्य प्रशासन विभागाच्या प्रतिनियुक्तीबाबतच्या संदर्भ क्र. ३ व ४ येथील शासन निर्णयातील निकषानुसार पात्र आहेत. श्री. एस.जे.कोरबु, उद्योग सहसंचालक (गट-अ) यांची तांत्रीक सल्लागार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी, मुंबई या रिक्त पदावर महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण कालावधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी, सेवेतून काढून टाकणे) नियम १९८१ च्या परिशिष्ट २ मध्ये विहीत केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून तसेच संदर्भ क्र. ३ व ४ येथील शासन निर्णयातील तरतूदीनुसार या आदेशाच्या दिनांकापासून या तीन वर्षाच्या कालावधीसाठी म्हणजेच दि.२७.०८.२०१९ ते २६.०८.२०२२ या तीन वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे.

३. श्री.एस.जे.कोरबु, उद्योग सहसंचालक (गट-अ) उद्योग संचालनालय, मुंबई यांचे प्रतिनियुक्तीबाबतचे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र. ३ व ४ येथील शासन निर्णयातील तसेच उक्त अटीच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

४. श्री.एस.जे.कोरबु यांच्या प्रतिनियुक्तीने उद्योग सहसंचालक, उद्योग संचालनालय, मुंबई या रिक्त झालेल्या पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री. एस.जे.कोरबु, तांत्रीक सल्लागार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी, मुंबई यांच्याकडे पुढील आदेशापर्यंत सोपविण्यात येत आहे.

५.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८२७१४४४२३१९१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Namdeo
Kondiba Bhosale

Digitally signed by Namdeo Kondiba Bhosale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db1ca2341132b954db9052b5ef3bd93e7410456a96fa70df7ff81c68231fcd3, serialNumber=8c6a286229ecc7982a08553f49d547ef64be25c7f26fc96324ece7cccbfeb8c5, cn=Namdeo Kondiba Bhosale
Date: 2019.08.27 14:51:01 +05'30'

(डॉ.ना. कों. भोसले)
शासनाचे उप सचिव.

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
२. मा.मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव.
३. मा.राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव.
४. अप्पर मुख्य सचिव (उद्योग) यांचे स्वीय सहायक.
५. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने *)
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी
७. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई.
८. उप सचिव, (उद्योग-१४) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. उद्योग सह संचालक, सर्व विभागीय कार्यालये.
१०. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता /लेखा परीक्षा), मुंबई /नागपूर.
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१३. कक्ष अधिकारी (उद्योग-१४), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. निवड नस्ती (उद्योग-३).